# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार**
**क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.३३६/२०२३/नंदुरबार मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.अशोक मदन प्रकाशकर,<br>रा.१८, पटेलवाडी, कोरीट रोड,<br>मु.पो.ता.जि.नंदुरबार. | वनक्षेत्रपाल,<br>वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय,<br>वन भवन, तहसिल कार्यालयाजवळ, मिशन हायस्कूल समोर, तळोदा रोड, नंदुरबार ता.जि.नंदुरबार ४२५ ४१२. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.३३६/२०२३/नंदुरबार संदर्भात दि.१०/०६/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार श्रीमती एस.सी.अवसरमल यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार श्रीमती एस.सी.अवसरमल यांनी आयोगाकडे दि.०८/०१/२०२६ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदार यांच्या मुळ माहिती अधिकार अर्ज दि.०७/०९/२०२१ अन्वये मागणी केलेली माहिती ही दि.१६/०६/२००८ ते ३१/०५/२०१२ व ०१/१०/२०१३ ते ३१/१०/२०१६ या कालावधीतील हजेरी पत्रकांची माहितीची मागणी केलेली होती. परंतू सदरची माहितीबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) नंदुरबार यांनी पुरविली नाही. तसेच माझ्याकडे जून २०२२ पासून सदर वनक्षेत्राचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला होता. मी हजर झाल्यापासून सदर ठिकाणी कोणताही कार्यालयीन स्टाफ, लिपिक, लेखापाल किंवा कार्यालयीन कर्मचारी ही पदे भरलेली नाही. तसेच सदर कार्यक्षेत्रात अतिक्रमण निष्कासन मोहिम सुरु असल्याने नंदुरबार रोहयो वनक्षेत्रा अंतर्गत १६०० हे. अंतर्गत अतिक्रमण काढण्याची आपत्कालीन मोहिम राबविण्यात आलेली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी मागणी केलेली माहितीबाबत नजरचुकीने तक्रारदार यांना सूचित करण्याचे राहून गेलेले असून यापुढे याबाबत नक्कीच काळजी घेण्यात येईल याची दक्षता ठेवीत आहे. परंतू तक्रारदार मागणी करता असलेली माहिती ही स्वत: तक्रारदार यांच्या मुलाने औरंगाबाद उच्च न्यायालयात पीआयएल क्र.१०४/२०१७ दाखल करुन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाने आदेश दि.११/०३/२०२० Since the apprehension is expressed that, the record relating to alleged malpractices committed by the officials of the forest department is being tampered with, the respondent No.२ the Principal Chief Conservator of Forest is directed to ensure safe custody of record the concerned respondent shall also ensure that Record is not tampered with and that the officers concerned allegedly involved in the incidents of misappropriation or against whom the allegations are levelled, Do not have access to the said record. Necessary steps shall be taken by the respondent No.२ forthwith नुसार ही माहिती सीलबंद केलेली आहे हे तक्रारदार यांना ज्ञात असून देखील माहिती अधिकार अर्जाचा दुरुपयोग करुन प्रशासनास वेठीस धरत आहे. तक्रारदार हे स्वत: याच नंदुरबार वन विभागातील सेवानिवृत्त वनपरिक्षेत्र अधिकारी असून त्यांच्यावर विभागामार्फत दोन एफआयआर दाखल केलेले आहेत. तक्रारदार यांच्यावर स्वाक्षरीकर्ते यांनी दि.२५/०३/२०२५ अन्वये उपनगर पोलीस

स्टेशन नंदुरबार येथे खंडणीचा अदाखलपात्र गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच तक्रारदार यांच्या नेहमीच माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग बाबत देखील आपणांस सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दि.२५/०५/२०२३ रोजी लेखी कळविले आहे. आपणांस अत्यंत नम्र विनंती करण्यात येते की, तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती ही औरंगाबाद उच्च न्यायालयात पीआयएल क्र.१०४/२०१७ अन्वये विभागीय कार्यालयात सीलबंद असून सदर माहिती ही मिळू शकत नाही हे तक्रारदार यांना माहिती असून देखील मुद्दाम त्रास देण्याच्या उद्देशाने तक्रार अर्ज व माहिती अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत. तथापि सदर वनक्षेत्राचा अतिरिक्त कार्यभार मनुष्यबळाचा पूर्णत: अभाव यामुळे सदर आदेशाचे पालन होऊ शकले नाही. तरी येथून पुढे याबाबत काळजी घेण्यात येईल तरी माझे म्हणणे ग्राहय धरावे ही नम्र विनंती.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, आयोगाने द्वितीय अपिल क्र.५९३/२०२२/नंदुरबार संदर्भात दि.०८/१२/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीचे आदेश दि.२२/०२/२०२३ रोजी निर्गमित केलेले आहेत. आयोगाच्या आदेशावेळी कार्यरत वनपरिक्षेत्र अधिकारी (रोहयो) नंदुरबार श्रीमती एस.सी.अवसरमल यांच्याकडे त्या वनपरिक्षेत्राचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला असून कार्यालयीन स्टाफ उपलब्ध नसल्याचे दिसून येते. तसेच सदर कार्यक्षेत्रात अतिक्रमण निष्कासन मोहिम सुरु असल्याने नंदुरबार रोहयो वनक्षेत्रा अंतर्गत १६०० हे. अंतर्गत अतिक्रमण काढण्याची आपत्कालीन मोहिम राबविण्यात आलेली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी मागणी केलेली माहितीबाबत नजरचुकीने तक्रारदार यांना सूचित करण्याचे राहून गेलेले असल्याचे दिसून येते. याव्यतिरिक्त तक्रारदार यांच्या मुलाने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे पीआयएल क्र.१०४/२०१७ दाखल केलेली असून त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने सदरची माहिती ही सीलबंद करावी व त्यामध्ये कोणालाही प्रवेश देऊ नये असे आदेशित केले असल्याचे दिसून येते. त्यामुळे तक्रारदार यांना मागणी केलेली माहिती देता येणे शक्य नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार (श्रीमती एस.सी.अवसरमल) यांनी दि.०८/०१/२०२६ अन्वये आयोगास सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल (रोहयो) यांचे कार्यालय, नंदुरबार (श्रीमती एस.सी.अवसरमल) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येवून त्यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.३३६/२०२३/नंदुरबार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जा.क्र. ८८० , दिनांक :- 03 FEB 2026